जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पोलीस असल्याचे भासवून वृद्ध व्यक्तीला फसवून सोन्याच्या अंगठ्या पळविल्या

नगर - पोलीस असल्याचे भासवून दोन अनोळखी इसमांनी एका ७४ वर्षीय वृद्ध व्यक्तीला विश्वासात घेऊन ५५ हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या व तांब्याच्या अंगठ्या घेऊन फसवणूक केली आहे. ही घटना ९ऑगस्ट रोजी सकाळी ११.५० ते १२ वाजेदरम्यान सावेडीतील जॉगिंग पार्कजवळ घडली.

या बाबत रविंद्र नारायण राजहंस (वय ७४, रा. अशोकनगर, भिंगारदिवे मळा, सावेडी) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्यादी आहे. फिर्यादी हे त्यांच्या मोपेडवर थांबलेले असताना, दोन अनोळखी इसम त्यांच्याजवळ आले. एक इसम मोटारसायकलवर होता व दुसरा पायी. दोघांनीही पोलिस असल्याचे सांगून यातील एकाने आपले ओळखपत्र दाखवत 'सक्सेना' यांचा पत्ता विचारला. त्यांच्या घरी काहीतरी आक्षेपार्ह सापडले असल्याने आम्हाला त्याच्या घरी जायचे आहे असे सांगितले. त्यावर फिर्यादी यांनी मी येथे राहणारा नाही मला माहित नाही असे म्हटले.

त्यावेळी त्या दोघांनी तेथून पायी जाणाऱ्या एकास थांबवून पत्ता विचारुन त्यास त्याच्या गळ्यातील चेन व पैसे बॅगमध्ये ठेवण्यास सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर,त्यांनी सुरक्षेच्या कारणास्तव फिर्यादी यांच्याकडील एक तोळा वजनाची सोन्याची पिळ्याची अंगठी, एक तोळा वजनाची सोन्याची अंगठी, दोन सोन्याच्या अंगठ्यांचे सुरक्षिते करीता असलेल्या तांब्याच्या रिंगा असा ऐवज मागवून घेतला आणि तो पिशवीत टाकल्याचे भासवले. त्यानंतर पिशवी फिर्यादी यांच्याकडे घेऊन तेथून जॉगिंग पार्कच्या दिशेने निघून गेले. पिशवीतील ऐवज खिशात ठेवण्यासाठी फिर्यादी यांनी पिशवीत पाहिले असता त्यांना आतमध्ये ऐवज दिसून आला नाही. यावरुन दोघांनी आपली फसवणूक केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या प्रकारामुळे फिर्यादी यांनी तत्काळ तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी रवींद्र राजहंस यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन दोन अज्ञात इसमांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २०४, ३१८ (४), ३१६ (२), ३ (५) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
'मुसाफिर'-९८२२०२०६९१

## पैसा कमवायचा? गुंतवणुक क्षेत्रातील खास पुस्तके वाचा




प्रत्येकाची जडण-घडण, स्वभाव व जीवन विषयक दृष्टीकोन, निरनिराळे असतात तरी पण आजच्या कलयुगात पैसा हा सर्वाधिक महत्त्वाचा आहे. याविषयी १००% एकमत होईल.

वाढत्या साक्षरतेसह अर्थार्जन, आर्थिक साक्षरता, समज वाढत आहे. अगदी महिला वर्गसुद्धा स्वावलंबी बनणे व कौटुंबिक प्रगतीसाठी पुढे आल्या आहेत.

आज सोशल माध्यमे, मासिके, वृत्तपत्रे-शेअर बाजार, म्युच्युअल फंड व आर्थिक नियोजनाबाबत अवगत करीत आहेत.

याविषयी हजारो पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. यातील जगभरात लोकप्रिय झालेली, ठरलेली काही पुस्तके विविध गुंतवणूक पद्धती उलगडून सांगतानाच दीर्घकालीन गुंतवणूक, अल्पकालीन व्यापार, स्टॉक किंवा फंड निवडणे त्यांचे मूल्यांकन, मानसिकता, आर्थिक शिस्त, फायदेशीर निर्णय कसे घ्यावे याबाबत मार्गदर्शन करतात.

नवशिक्यांसाठी ती समाजायला सोपी असून अनुभवी गुंतवणूकदारांसाठीही ती बौद्धिक संपत्ती ठरतात.

प्राथमिक पातळीला मराठी अनुवाद झालेले रीच डॅड पुअर डॅड, बडी सोच का बडा जादू या पुस्तकांना वाचता येईल.

जिज्ञासू व अनुभवींसाठी खालील पुस्तके व लेखक वाचनीय आहेत - १) द वॉरेन बफेट वे - रॉबर्ट जी. हॅगस्ट्रॉम २) वन अप ऑन वॉल स्ट्रीट - पीटर लिंच ३) द सायकॉलॉजी ऑफ मनी - मॉर्गन हॉउझेल ४) द इंटेलिजंट इन्व्हेस्टर - बेंजामिन ग्रॅहम, कॉमन स्टॉक्स ॲण्ड अनकॉमन प्रॉफिटस् - फिलीप फिशर ६) गाईड टू इंडियन स्टॉक मार्केट - डॉ. अनिल लांबा ७) व्हॉट एव्हरी इंडियन शुड नो बिफोर इन्व्हेस्टींग - विनोद पोड्डायल

अशी अनेक इंग्रजी, हिंदी, मराठीत अर्थविषयक पुस्तके आहेत. याच्या वाचनाने अर्थ जाणिवा समृद्ध होतात. किमान बिझनेस चॅनल, दर सोमवारी विविध वृत्तपत्रातील संबंधित लेख, विश्लेषण वाचले, पाहिले पाहिजे. 'जान है तो जहान है' याप्रमाणे 'पैसा हे तोही लोग पूछेंगे कैसा है?' बघा पटतयं ना...

# रिक्षातून महिलेच्या पर्समधून सोन्याच्या दागिन्यांसह रोकडची चोरी

नगर - ऑटो रिक्षातून प्रवास करणाऱ्या महिलेच्या पर्समधून २० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा ऐवज तीन संशयित महिलांनी नजर चुकवून चोरुन नेल्याची घटना छत्रपती संभाजीनगर रोडवरील हॉटेल पंचवटी ते चांदणी चौक दरम्यान १० ऑगस्ट रोजी दुपारी २.४५ ते ३ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत शिल्पा राहुल भंडारी (वय ४५, रा. सह्याद्री कॉलेज समोर, संगमनेर) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. फिर्यादी या छत्रपती संभाजीनगर रोड वरील हॉटेल पंचवटी येथून माळीवाडा बस स्थानक येथे जाण्याकरिता ऑटो रिक्षा मध्ये बसल्या, त्यावेळी रिक्षामध्ये तीन अनोळखी महिला बसलेल्या होत्या. फिर्यादी या रिक्षाने जात असताना चांदणी चौक येथे रिक्षा मधील महिला उतरुन निघून गेल्या. त्या महिला निघून गेल्यानंतर फिर्यादी यांनी त्यांची पर्स पाहिली असता त्यांना पर्सची चेन उघडी दिसली.

त्यांनी पर्समध्ये ठेवलेले १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे चेन व पेंडल मध्ये गाठलेले मंगळसूत्र, ६ ग्रॅम वजनाचे कानातील पानाचे आकाराचे व त्यास खाली गोल राऊंड असलेले झुमके, ७०० रुपये रोख रक्कम असा ऐवज दिसून आला नाही. फिर्यादी यांनी पर्सची पूर्ण पाहणी केली असता त्यांना त्यांचा ऐवज मिळून आला नाही. यावरुन रिक्षामध्ये बसलेल्या तीन अनोळखी महिलांनी फिर्यादी यांची नजर चुकवून पर्सची चेन उघडून आतील ऐवज चोरुन नेल्याचा त्यांना संशय आला.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात शिल्पा भंडारी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संशयित तीन अनोळखी महिलांविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक निसार शेख हे करीत आहेत.

## केडगावच्या शास्त्रीनगर येथे तरुणाची गळफास घेत आत्महत्या

नगर - राहत्या घरी किचनमध्ये छताला गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केल्याची घटना केडगाव येथील शास्त्रीनगर येथे ९ ऑगस्ट रोजी रात्री घडली. रोहन बाबासाहेब कराड (वय २६, रा. शास्त्रीनगर, केडगाव) असे मृत तरुणांचे नाव आहे.


रोहन कराड (मयत)

रोहन याने गळफास घेतल्याचे निदर्शनास येतात त्याचा मावस भाऊ निखिल देविदास आव्हाड याने खासगी म्बुलन्सने त्यास जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी त्यास तपासून तो औषधोपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे घोषित केले.याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस नाईक आनंद दाणी हे करीत आहेत.

मयत रोहन याच्यावर केडगाव येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात पत्नी, आई-वडील, भाऊ असा परिवार आहे.

# विनापरवाना फ्लेक्स लावणाऱ्यांवर महानगरपालिकेकडून गुन्हे दाखल

नगर - मध्य शहरात आस्थापनांच्या जाहिरातींसाठी, तसेच सण उत्सवाच्या शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात फलक लावले जात आहेत. मध्यवर्ती शहरात अनधिकृतपणे कोणतीही परवानगी न घेता लावलेल्या तीन फलकांवर महानगरपालिकेने कारवाई केली आहे. फलक लावणाऱ्या तिघांवर तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विनापरवाना फ्लेक्स, इतर फलक लावणाऱ्यांवर यापुढे दंडात्मक व फौजदारी अशा दोन्ही स्वरूपाच्या कारवाया केल्या जाणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.



शहरात फ्लेक्स, फलक लावण्यापूर्वी महापालिकेची रीतसर परवानगी घ्यावी, असे आवाहन यापूर्वी वेळोवेळी महापालिकेकडून करण्यात आले आहे. अनधिकृत फ्लेक्स, पोस्टर, फलक लावणाऱ्यांवर महानगरपालिकेकडून गुन्हेही दाखल करण्यात आले होते. आता महापालिकेने पुन्हा कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. प्रभाग अधिकाऱ्यांना संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

महानगरपालिकेच्या शहर प्रभाग समिती कार्यालयाचे प्रभाग अधिकारी राकेश कोतकर यांनी रविवारी तिघांविरोधात पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दिल्ली गेट वेस येथे नारळी पौर्णिमा व रक्षा बंधननिमित्त शुभेच्छा देण्यासाठी श्री ज्वेलर्सचे श्रीकांत रमेश मंडाल, बेलेश्वर मंडप लाईट व साऊंड डेकोरेटर्सचे अंबादास गोटीपामूल व दारुळाचा मारुती रोड चौक येथे एकदंत ग्रुप, शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठान यांच्यातर्फे ऋषिकेश भाऊ सामल या नावाचे विनापरवाना फ्लेक्स बोर्ड लावण्यात आल्याचे आढळून आल्याने शहराचे विद्रुपीकरण केल्याप्रकरणी त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नितीन घाटेशाही यांचे अल्प आजाराने निधन

भिंगार - सदर बाजार भिंगार पोलिस स्टेशन येथील रहिवासी नितीन सखाराम घाटेशाही (तलाठी भाऊसाहेब) (वय ४७) यांचे १० ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे आई, भाऊ, भावजय, २ बहिणी, मेहुणे असा परिवार आहे. सोनई येथे तलाठी म्हणून कार्यरत आहेत.

## सावेडीत तरुणीची घरात गळफास घेत आत्महत्या

नगर - राहत्या घराच्या छताला गळफास घेऊन विवाहित तरुणीने आत्महत्या केल्याची घटना १० ऑगस्ट रोजी सकाळी सावेडी येथील गणेश चौक येथे घडली. सोनाली ऋषिकेश नासन (वय १८, रा.गणेश चौक, सावेडी)असे मृत तरुणीचे नाव आहे.

सोनाली हिने गळफास घेतल्याचे निदर्शनास येतात तिचे नातेवाईक दीपक विक्रम साबळे (रा.गणेश चौक, सावेडी) यांनी तातडीने तिला जिल्हा शासकीय रुग्णालयात खासगी ॲम्ब्युलन्सने उपचाराकरिता दाखल केले. तेथील डॉक्टरांनी तिला तपासून ती उपचारापूर्वीच मयत झाली असल्याचे घोषित केले. याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. खेडकर यांच्या अहवालानुसार तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गणेश लबडे हे करीत आहेत. मयत सोनाली हिचा ६ महिन्यांपूर्वीच विवाह झालेला होता. मात्र १५ दिवसांपूर्वी तिच्या पतीचा अपघात झाला होता, तेव्हापासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. सावेडीत पती पत्नी दोघेच राहात होते. त्यांच्यात कुठलेही वाद झालेले नव्हते असे नातेवाईकांनी पोलिसांना सांगितले. तरी तिने आत्महत्या का केली याचा पोलिस शोध घेत आहेत.

## शेतात विजेचा शॉक बसून महिलेचा मृत्यू

नगर - शेतात काम करत असताना विजेचा शॉक बसून महिलेचा मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील देहरे गावच्या शिवारात १० ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास घडली. रेखा रामदास काळे (वय ३९, रा.देहरे, ता.नगर) असे मयत महिलेचे नाव आहे.


रेखा काळे (मयत)

मयत रेखा काळे या दुपारी शेतात काम करत असताना त्यांना अचानक विजेचा शॉक बसला. त्यामुळे त्या गंभीर जखमी होवून बेशुद्ध पडल्या. ही बाब निदर्शनास येताच त्यांना त्यांचे नातेवाईक महेश काळे व इतर नागरिकांनी तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉ.सचिन तोडमल यांनी त्यांना तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत डॉक्टरांच्या अहवालावरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत रेखा यांच्या पश्चात पती, १ मुलगा, १ मुलगी, सासू, सासरे, दिर, जावा, पुतणे असा परिवार आहे.

## छगनलाल बंग यांचे हृदयविकाराने निधन

नगर - सावेडी- वसंतटेकडी परिसरातील जयश्री एन्टरप्रायजेस आणि जयश्री इलेक्ट्रीक सोलर चे संचालक छगनलाल रामदयाळ बंग (वय ५७) यांचे ९ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले.



छगनलाल बंग हे कॉम्प्युटर व्यवसायातील जुने व्यावसायिक होते. अत्यंत मनमिळावू व सामाजिक कार्याची आवड त्यांना होती. नगरच्या श्री रामकृष्ण अर्बन सह. क्रेडिट सोसायटीचे चेअरमन किसनलाल बंग यांचे ते लहान बंधू होते.

त्यांच्या पश्चात आई, वडील, काकू, पत्नी, दोन मुली, जावई, तीन भाऊ, दोन बहिणी, दोन पुतणे असा परिवार आहे.

## श्रीकांत मुथा यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - गणेशवाडी स्वस्तीक चौक येथील रहिवासी श्रीकांत बन्सीलाल मुथा (वय ८६) यांचे १० ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, सुन, भाऊ, नातवंडे, १ मुलगी, जावई असा परिवार आहे. ते अशोक मुथा यांचे बंधू तर अतुल, अभिजित (पप्पू) मुथा, सौ. अंजली मेहेर यांचे वडील होत. अमित मुथा व स्मिता पाठक यांचे चुलते होत.

## कामरगाव घाटात कार पलटी होऊन वृद्धाचा जागीच मृत्यू

नगर - भरधाव वेगात जाणाऱ्या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटून कार पलटी झाली. या अपघातात ७८ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला तर अन्य दोघे गंभीर जखमी झाली ही घटना नगर पुणे रोडवरील कामरगाव घाटात हॉटेल गुरुदेव समोर १४ जुलै रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी १० ऑगस्ट रोजी कार चालकावर नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शमशुद्दीन रहीम शेख (वय ७८, रा. चिचोंडी पाटील, ता. अ.नगर) असे मयताचे नाव आहे.

याबाबत जब्बार शमशुद्दीन शेख (वय ४१, रा. चिचोंडी पाटील, ता.नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जानीमिया दुलेमिया सय्यद (रा. पुणे) याने त्याच्या ताब्यातील वैगनर कार (क्र.एम एच १२ एस यू ३७१९) ही भरधाव व निष्काळजीपणे चालवली. त्यामुळे कारवरील नियंत्रण सुटून ती थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्यात जाऊन पलटी झाली. या अपघातात कारमधील प्रवासी शमशुद्दीन रहीम शेख (वय ७८, रा. चिचोंडी पाटील, ता. अ.नगर) यांचा मृत्यू झाला, तर फैमिदी शमशुद्दीन शेख ( रा. चिचोंडी पाटील तालुका नगर) व कारचालक जानीमिया सय्यद हे जखमी झाले.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात जब्बार शेख याने दिलेल्या फिर्यादीवरुन जानीमिया सय्यद याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५(३), १२५ (४), ३२४(४) तसेच मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक एकनाथ आव्हाड हे करीत आहेत.

# नगर-पुणे महामार्गावर २ कारचा भीषण अपघात

## ८ वर्षीय बालिकेचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू

नगर - नगर-पुणे महामार्गावरील पळवे खुर्द गावाजवळ रक्षाबंधनाच्या दिवशी ९ ऑगस्ट रोजी सकाळी १०.४५ च्या सुमारास दोन कारची धडक होऊन झालेल्या अपघातात ८ वर्षीय बालिका गंभीर जखमी झाली. तिला नगर येथील खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. सुरु असताना तिचा १० ऑगस्ट रोजी दुर्दैवी मृत्यू झाला आहे. कु. अन्वी बाळासाहेब खडके (रा. चिचोंडी पाटील, ता.नगर) असे मयत बालिकेचे नाव आहे.


अन्वी खडके (मयत)

मयत अन्वी ही तिच्या आई वडिलांसह कार ने चिचोंडी पाटील येथून पुण्याकडे चालली होती. त्यांची कार पारनेर तालुक्यातील पळवे खुर्द गावाजवळ गेली असता. पुण्याहून नगर कडे भरधाव वेगात येणाऱ्या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ती कार दुभाजक ओलांडून खडके यांच्या कार वर येवून आदळली. या धडकेने कार मधील अन्वी ही गंभीर जखमी झाली. तिला स्थानिकांच्या मदतीने प्रथम शिरूर येथे व नंतर उपचारासाठी पुढील उपचारासाठी नगर येथील खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरु असताना तिचा १० ऑगस्ट रोजी मृत्यू झाला. या प्रकरणी मयत अन्वी हिचे आजोबा सुभाष रामभाऊ गुंड (वय ६१, रा. मुर्शिदपूर, ता. आष्टी) यांनी सुपा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून कारचालक महिला पल्लवी प्रितेश खरात (रा.पुणे) हिच्या विरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत अन्वी हिच्या पश्चात आई, वडील, १ भाऊ असा परिवार आहे.

## रामदास कांबळे यांचे वृध्दापकाळाने निधन

श्रीरामपूर - येथील सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी रामदास हौशीराम कांबळे (वय ७५) यांचे १० ऑगस्ट रोजी वृध्दापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सुन, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नेवासारोड येथील मार्केट यार्ड जवळील गुरुकृपा ऑटोमोबाईल्सचे मालक संदिप कांबळे यांचे वडील, यमाजी कांबळे व लक्ष्मण कांबळे यांचे बंधू होत.

## दिलीप गीते यांचे अल्पश: आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील दिलीप बाबुराव गीते (वय ६५) यांचे ९ ऑगस्ट रोजी अल्पश: आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, एक मुलगा, सून, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. राम मंदिर चौकातील गीते टी हाऊसचे मालक विशाल गीते यांचे वडील, अरुण गीते यांचे थोरले बंधू होत.

## सर्जेराव राऊत पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर - येथील सर्जेराव काशिनाथ राऊत पाटील (कोल्हारकर) (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. पटेल हायस्कूलचे शिक्षक जालिंदर (राजेंद्र) राऊत यांचे वडील, भोकर येथील गोरक्षनाथ माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ.संगीता जालिंदरनाथ राऊत यांचे सासरे, राहुरीचे पत्रकार भाऊसाहेब येवले यांचे सासरे, विक्रांत व कांचन राऊत यांचे आजोबा होत.

## भीमराज मोहारे (आण्णा) यांचे वृद्धपकाळाने निधन

श्रीगोंदा - तालुक्यातील कोरेगाव येथील शेतकरी भीमराज बळवंतराव मोहारे (वय ८०) यांचे वृद्धपकाळाने नुकतेच निधन झाले.



ते आण्णा या नावानेच परिचित होते. २० वर्षे त्यांनी सोसायटीचे सचिव म्हणून नगर तालुक्यातील गुंडेगाव, वाळकी, राळेगाव म्हसोबाचे या ठिकाणी दक्ष अधिकारी म्हणून काम पहिले. सेवानिवृत्ती नंतर त्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करण्यास सुरुवात केली. गोविंदबन कृषी पर्यटन केंद्र व वॉटर पार्क त्यांनी मुलगा बाळासाहेब यांच्या मदतीने सुरु केले.

त्यांच्यामागे पत्नी पद्मावती, भाऊ वसंतराव, मुलगा बाळासाहेब, पुतणे, पुतणी, जावई, सुना, नातवंडे, असा परिवार आहे.

## ट्रॅक्टर उलटून शेततळ्यात पडल्याने तरुणाचा मृत्यू

नगर - रस्त्याने ट्रॅक्टर चालवत घेवून जात असताना चालकाचे ट्रॅक्टर वरील नियंत्रण सुटून ट्रॅक्टर पलटी होवून शेततळ्यात पडला. या अपघातात ट्रॅक्टर चालक कैलास अमृता अहीरे (वय ३५, रा. देहरे, ता. नगर) याचा मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील देहरे गावच्या शिवारात वांबोरी रोड वर १० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. मयत कैलास हा देहरे गावच्या शिवारात असलेल्या वांबोरी रोड वर ट्रॅक्टर चालवत घेवून जात होता. त्याचे अचानक ट्रॅक्टर वरील नियंत्रण सुटले आणि तो पलटी होवून रस्त्याच्या कडेला असलेल्या शेत तळ्यात पडला. या ट्रॅक्टर खाली दबून कैलास हा पाण्यात बुडाला. ही बाब निदर्शनास येताच परिसरातील नागरिकांनी त्यास तातडीने उपचारासाठी विळद घाटातील विखे पाटील हॉस्पीटल येथे दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून तो उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याबाबत डॉक्टरांच्या अहवालावरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सेल्फ ॲडेसिव्ह पी व्हि सी वॉल टाईल्स, सेल्फ ॲडेसिव्ह वॉलपेपर,किचन वॉलपेपर, रोमन ब्लॉईडस्, रोलर ब्लॉईडस्, झेब्रा ब्लॉईडस्, व्हर्टिकल ब्लॉईडस, उडन ब्लॉईडस्, कस्टमाईज ब्लॉईडस्, चीक् ब्लॉईडस्, तयार कर्टन्स, कर्टन क्लॉथ, कर्टन रॉड व फिटींग, मच्छर जाळी, आर्टिफिशियल ग्रास, धुळी पासुन संरक्षणसाठी प्लास्टीक तयार पडदे
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# दृष्टीदोष असलेल्यांचे अंधकारमय जीवन आनंदऋषीजी नेत्रालयाने केले प्रकाशमय

## रवींद्र भंडारी यांचे प्रतिपादन


जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराचे दीपप्रज्वलन करताना रवींद्र भंडारी आदी.

### मोफत नेत्ररोग तपासणी शिबिरात ७११ रुग्णांची नेत्र तपासणी; ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांचा प्रतिसाद

नगर – दृष्टीदोष असलेल्यांचे अंधकारमय जीवन आनंदऋषीजी नेत्रालय प्रकाशमान करत आहे. दुर्बल घटकांना आरोग्य सेवेच्या माध्यमातून आधार देत असताना, सर्व आरोग्य सुविधा एका छताखाली देण्याचा दिशादर्शक उपक्रम सुरु आहे. दर्जेदार, सर्वसुविधांनीयुक्त आणि तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसामान्यांना आरोग्यसेवा मिळत आहे. निरोगी समाजासाठी हॉस्पिटलने घेतलेला ध्यास व त्यासाठी सुरु असलेली निस्वार्थ रुग्णसेवा कौतुकास्पद असल्याची भावना रवींद्र भंडारी यांनी व्यक्त केली.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मोफत नेत्ररोग तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी रवींद्र भंडारी बोलत होते. याप्रसंगी सचिन भंडारी, श्वेता भंडारी, साधनाताई भंडारी, गिरीश शिंगवी, डॉ. लौकिक भंडारी, संतोष बोथरा, सतीश (बाबुशेठ) लोढा, डॉ. आशिष भंडारी, वसंत चोपडा, नेत्रतज्ञ डॉ. अशोक महाडिक, डॉ. संदीप राणे, डॉ. प्रतिक कटारिया आदींसह नेत्रालयाचे सर्व डॉक्टर उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात भंडारी परिवार सातत्याने योगदान देत आहे. शिबिराबरोबरच इतर उपक्रमात देखील त्यांचा हातभार लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर समाजाची गरज ओळखून आनंदऋषीजी नेत्रालय विभाग ७ वर्षापूर्वी कार्यान्वीत करण्यात आले. ग्रामीण भागात वाडी–वस्तीवर आरोग्यसेवा देण्याच्या उद्देशाने हे मिशन म्हणून कार्य करण्यात आले. ग्रामीण भागातील नेत्रदोष असलेले शेतकरी कुटुंबातील व्यक्ती हॉस्पिटलला आणून त्यांच्यावर मोतीबिंदू, काचबिंदूच्या शस्त्रक्रिया करुन त्यांना एक महिन्याचे औषध देऊन पुन्हा घरा पर्यंत सोडण्याचे काम करण्यात आले. या कार्यासाठी जिल्ह्यात १८ व्हिजन सेंटर कार्यान्वीत असून, प्रदीर्घ अनुभव असलेले नेत्रतज्ञ डॉक्टर या सेवेत जोडले गेले आहे. ग्रामीण भागातील ज्येष्ठांचे पालकत्व घेऊन ही सेवा दिला जात आहे. १७ ऑगस्ट पासून तारकपूर येथे आनंदऋषीजी हॉस्पिटलची शाखा सुरु करत असल्याची त्यांनी माहिती दिली.

सचिन भंडारी म्हणाले की, जगण्याचा आनंद घेण्यासाठी दृष्टी खूप महत्त्वाची आहे. अंधारलेले जीवन प्रकाशमय करुन त्यांच्या जीवनात आनंदाचे रंग भरण्याचे काम आनंदऋषीजी नेत्रालय करत आहे. या हॉस्पिटलच्या माध्यमातून खर्चिक आरोग्यसेवा गोर–गरीबांना घेणे सहज शक्य झाले असल्याचे सांगितले.

डॉ. संदीप राणे यांनी मोठ्या शहराच्या धर्तीवर नेत्र विकारावर अद्यावत सोयी–सुविधा उपलब्ध असून, तज्ञ डॉक्टर मंडळी आनंदऋषीजी नेत्रालयात सेवा देत आहे. १ लाख ४ हजार पेक्षा अधिक यशस्वी शस्त्रक्रिया करुन रुग्णांना नवदृष्टी देण्याचे काम करण्यात आले आहे. ग्रामीण भागात दृष्टीदोष असलेल्यांना ही सेवा आधार बनली असल्याची त्यांनी माहिती दिली. या शिबिरात ७११ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. सतीश लोढा यांनी आभार मानले.


महर्षी ग.ज. चितांबर विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'संरक्षण क्षेत्रातील कर्तृत्वाच्या संधी' या विषयावर निवृत्त हवाईदल कमांडर चारुदत्त प्राणी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी त्यांचा सत्कार करताना निलेश वैकर आदी.

# चितांबर विद्यालयात विद्यार्थ्यांना राष्ट्रसेवेचे धडे

नगर – येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग.ज. चितांबर विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'संरक्षण क्षेत्रातील कर्तृत्वाच्या संधी' या विषयावर निवृत्त हवाईदल कमांडर चारुदत्त प्राणी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटेग्रिटी यांच्या वतीने या उपक्रमात चारुदत्त प्राणी यांनी अत्यंत सुरेख चित्रफितीच्या माध्यमातून संरक्षण क्षेत्राशी संबंधित विविध उपक्रम आणि रोजगाराविषयी मार्गदर्शन केले. संरक्षण क्षेत्रातील सेवा म्हणजे स्वाभिमान आणि राष्ट्राप्रती समर्पण करण्याची संधी असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. इयत्ता आठवी उत्तीर्ण पासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंतचा कोणत्याही शाखेतील विद्यार्थी लष्कराच्या विविध आस्थापनां मध्ये राष्ट्रसेवेसाठी सामील होऊ शकतात असे त्यांनी यावेळी सांगितले. विद्यालयातील इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी संरक्षण क्षेत्रातील भरती प्रक्रिया, विविध प्रवेश परीक्षा, प्रश्नपत्रिका स्वरूप, शारीरिक चाचण्या या बाबींची विस्तृत माहिती यावेळी जाणून घेतली.

यानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटेग्रिटीच्या अध्यक्षा शुभश्री पटनाईक होत्या. यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लबचे सचिव निखिल कुलकर्णी, माजी अध्यक्ष चंदना गांधी, नव विद्या प्रसारक मंडळाचे सचिव रोटरीयन निलेश वैकर, मुख्याध्यापिका विभावरी रोकडे आदी उपस्थित होते. मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांनी मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक केले. निखिल कुलकर्णी यांनी रोटरी क्लब मार्फत आयोजित विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रशांत कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.


श्रावणी पौर्णिमेनिमित्त तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडिया व भिक्खू संघाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर सुकत वंदन करण्यात आले.

# श्रावणी पौर्णिमेनिमित्त खीरदान व वंदन

नगर – श्रावणी पौर्णिमेनिमित्त तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडिया व भिक्खू संघाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर सुकत वंदन करण्यात आले. यानंतर पारंपरिक खीरदान कार्यक्रम पार पडला.

यावेळी संजय कांबळे, प्रतीक बारसे, भंन्ते धम्मपाल, बाल श्रामणेर, सारिपुत्त श्रामणेर, अंनद श्रामणेर, अंगुलीमाल श्रामणेर, संदिप वाघमारे, मोहन शिरसाठ, मिलिंद पगारे, दिपक गायकवाड आदीसह उपासक उपसिका भिक्खू संघाचे सदस्य उपस्थित होते.

# आयुष्यात प्रत्येकाने नाती जपली पाहिजेत

## डॉ. अनुपमाजी म.सा. यांचे प्रतिपादन



आनंदधाम येथे रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

### आनंदधाम येथे रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा

नगर – आनंदधाम येथे शनिवारी रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. अभिमंत्रित राखी, विधीवत पूजा करून राखी बाधण्याचा कार्यक्रम झाला. बहिण भावासह सासू सून, सासरे सून, वडील मुलगी, ननंद भाऊजी, जेठाणी देवरानी अशा विविध नात्यांना प्रेमाच्या, आपुलकीच्या धाग्याने जोडण्यात आले.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषिजी म.सा., वात्सल्य मूर्ती डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., विदुषी डॉ. अनुपमाजी म. सा. आदी ठाणा यांच्या सान्निध्यात झालेल्या या कार्यक्रमात भाविक सहभागी झाले होते.

पूजा थाळीत चंदन कापूर लावून अभिमंत्रित राखी विधीवत बांधण्यात आली. साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात राखी पौर्णिमा साजरी करताना प्रत्येकाचा आनंद द्विगुणित झाला होता. यावेळी श्रावक संघाचे संतोष बोथरा, पेमराज बोथरा, संतोष गांधी, आनंदराम मुनोत, सतीश लोढा, राजेश बोरा, रतिलाल कटारिया, अमोल कटारिया, आनंद चोपडा, शुभम मेहर, मदन मुनोत, विकास गांधी, मनिषा मुनोत उपस्थित होते

डॉ. अनुपमाजी म. सा. म्हणाल्या की, राखी पौर्णिमा हा सण नात्यांची जपणूक करण्याची शिकवण देतो. आयुष्यात प्रत्येकाने नाती जपली पाहिजे. राखीचा धागा नात्यांची वीण घट्ट करणारा असतो. आज या ठिकाणी सर्वांचा उत्साह पाहून खूप आनंद झाला. आचार्यश्रींच्या पावन भूमीत सध्या चातुर्मास अतिशय प्रसन्न वातावरणात सुरू आहे. नित्य प्रवचन तसेच विविध धार्मिक कार्यक्रम, जप तप आराधना केली जात आहे. राखी पौर्णिमा सुद्धा भाविकांच्या उत्साहामुळे संस्मरणीय ठरली आहे.

यावेळी श्रावक संघातर्फे लकी ड्रॉ काढून ९ चांदीच्या व १ सोन्याची राखी भाग्यवान विजेत्यांना देण्यात आल्या. भेटवस्तू व पेढ्यांची व्यवस्था करण्यात आली होती. याप्रसंगी अभिमंत्रित गुरु चरण कमल लकी ड्रॉ काढून भाविकांना देण्यात आले. कार्यक्रमानंतर भाविकांसाठी श्रावक संघाच्या वतीने गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली होती.

# श्री मार्कंडेय रथोत्सव पालखी सोहळ्यात पद्मशाली समजाच्या पारंपारिक संस्कृतीचे दर्शन



नारळी पौर्णिमे निमित्तनगरच्या श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय महामुनींच्या पालखी रथोत्सव मिरवणुकीस शुभारंभ करताना सचिन जगताप व महेंद्र गंधे. समवेत श्रीकांत छिंदम, संजय वल्लाकट्टी, श्रीकांत छिंदम यांच्यासह सर्व पदाधिकारी.

नगर – नारळी पौर्णिमा उत्सवा निमित्त अहिल्यानगरच्या श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्ट व पद्मशाली पंच कमिटी ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय रथोत्सव पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भाजपचे माजी शहर जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप यांच्या हस्ते मार्कंडेय महामुनींच्या पालाखीची महाआरती करून रथोत्सव पालखी मिरवणूकीस सुरुवात झाली. यावेळी पद्मशाली समाजाच्या पारंपारिक संस्कृतीचे दर्शन घडवणारी रथयात्रा मिरवणूक काढण्यात आली. देवस्थानचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम, पंच कमिटीचे अध्यक्ष संजय वल्लाकट्टी, माजी उपमहापौर श्रीकांत छिंदम यांच्यासह सर्व पदाधिकारी व समजतील नागरिक उपस्थित होते.

महेंद्र गंधे म्हणाले, शहरातील मार्कंडेय महामुनींच्या ऐतिहासिक मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम सर्व विश्वस्त प्रयत्नपूर्वक करत आहेत. सर्व समाजांचे श्रद्धास्थान असलेले हे नवे मंदिर शहराच्या वैभवात भर घालणारे ठरेल. या मंदिराच्या कामासाठी जे काही सहकार्य लागेल ते मी देण्यास तयार आहे. राज्यातील भाजपच्या सरकारच्या माध्यमातूनही मंदिरास तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू.

यावेळी सचिन जगताप म्हणाले, मार्कंडेय महामुनी यांनी मोठी तपश्चर्या करून भगवान शंकरा कडून अमरत्व घेतले. सर्व पद्मशाली समाज मार्कंडेय महामुनींचा शिकवणीवर पुढे जात आहे. शहरात दरवर्षी भक्तिभावाने नारळी पौर्णिमेचा उत्सव साजरा करून सर्व समाजाला एकत्रित करत आहेत. देवस्थानचे ट्रस्टी व पंच कमिटीचे पदाधिकारी उत्कृष्ट काम करत आहेत.

श्रीपाद छिंदम म्हणाले, गेल्या वर्षी शहरातील मार्कंडेय महामुनींच्या या ऐतिहासिक मंदिराच्या जीर्णोद्धाराचेकाम आम्ही सुरु केले. मंदिराच्या ट्रस्टची जेव्हा नवी कमिटी स्थापन झाली तेव्हा पासूनच रखडलेल्या जीर्णोद्धार कामास सुरवात झाली आहे. पुढील वर्षी हे मंदिर पूर्ण करण्याचा आमचा मानस आहे.

श्रीकांत छिंदम म्हणाले, शहरातील नारळी पोर्णिमा उत्सवाला शेकडो वर्षांचा मोठा ऐतिहासिक वारसा आहे. यानिमित्ताने दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम व विधी झाल्यावर मोठ्या उत्साहात रथोत्सव मिरवणूक काढण्यात आली आहे.

संजय वल्लाकट्टी म्हणाले, पद्मशाली समाज हा कापड निर्माता आहे. आजही हा पारंपरिक व्यवसाय समाज करत आहे. नारळी पौर्णिमेचा सणानिमित्त शहरातल सर्व समाज एकत्रित येत असल्याने येथे उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले आहे.

या पालखी रथोत्सव मिरवणुकीत सजवलेल्या रथात मार्कंडेय महामुनींची पालखी ठेवण्यात आली होती. तसेच सजवलेल्या रथात महादेवाच्या पिंडीला कवटाळून बसलेल्या मार्कंडेय महामुनींची मोठी मूर्ती ठेवण्यात आली होती. पद्मशाली समाजाचा पारंपारिक व्यवसाय असलेला कापड विणण्याचे हातमाग यंत्रही या मिरवणुकीत होते. पद्मशाली समाजाचे पारंपारिक कोलालू नृत्य पथक, पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या मार्कंडेय विद्यालयाच्या विद्यार्थिनींचे टिपरी, लेझीम पथक व लाठीकाठी पथकात सहभागींचे सादरीकरण पाहण्यास नागरिकांनी गर्दी केली होती. शाळेतील विद्यार्थ्यांनी दिल्लीगेट येथे चित्तथरारक मल्लखांबाचे प्रात्यक्षिकेही सादर केली. या मिरवणुकीत तालयोगी ढोल ताशा ध्वज व झांज पथक सहभागी होते. रथोत्सव मिरवणुकी दरम्यान सहभागी भाविकांना ठीक ठिकाणी महाप्रसाद, अल्पोपहार, पाणी व सरबताचे वाटप करण्यात येत होते.

श्री मार्कंडेय रथोत्सव पालखी सोहळ्याचे नियोजन श्री मार्कण्डेय मंदिर देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष मनोज दुलम, सरचिटणीस प्रकाश कोटा, खजिनदार अजय म्याना, पद्मशाली पंचकमिटी विश्वस्त ट्रस्टचे उपाध्यक्ष बालराज सामल, सरचिटणीस विनायक मच्चा, खजिनदार शंकर येमूल, मार्गदर्शक माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम, विनायक गुडेवार, राजू म्यान, ज्ञानेश्वर मंगलारप व भीमराज कोडम, कृष्णहरी येलदंडी, नेहा गुंडू, आनंद यंगल, अजय लयचेट्टी, योगेश सिद्दम, बालाजी गोणे ,संजय चिप्पा, अंजय्या एक्कलदेवी, अशोक शेराल, मुकुंद लखापती, प्रवीण गुंडू, व्यंकटेश बोमादंडी, सुरेखा कोडम, अंजय्या यंगल, बालकृष्ण गोटीपामूल, राजेंद्र नागूल, महेश सब्बन, अमोल बोल्ली, महेंद्र येणगुल, सागर गोरे, कुणाल बुरगुल, दीपक गुंडू, सचिन गरदास, चंद्रकांत बेत्ती, नरेश कोटा, प्रवीण नराल, गणेश लकशेट्टी, नरेश बिल्ला, शुभम बोल्ली, अविनाश इराबत्तीन, सागर कोडम, रवींद्र बेट्टी, विजय सब्बन, रोहन येनगंदुल, सुमित ईप्पलपेल्ली, अनिता कोंडा, भरती न्यालपेल्ली, योगेश म्याकल, सुरज संदूपटला, सारिका मुदीगोंडा व कृष्णा दुडगु आदी पदाधिकाऱ्यांनी केले. यावेळी पद्मशाली समाजातील महिला, नागरिक, युवक व युवती सहभागी झाले होते.

# नारळी पौर्णिमा शोभायात्रेत 'महाकाली ऐॅक्ट' नृत्याचा जलवा

### ३२ मुखी महाकाली अवतार ठरला मुख्य आकर्षण, शिवराज्यकर्ते प्रतिष्ठान व श्री एकदंत मित्र मंडळाने जिंकली नगरकरांची मने



नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टच्या वतीने काढण्यात आलेल्या शोभायात्रा मिरवणुकीत श्री एकदंत गणेश मित्र मंडळ आणि शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठान यांनी सादर केलेल्या महाकाली ऍक्ट.

नगर – नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टच्या वतीने काढण्यात आलेल्या शोभायात्रा मिरवणुकीत श्री एकदंत गणेश मित्र मंडळ आणि शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठान यांनी सादर केलेल्या महाकाली ऍक्ट या अद्वितीय नृत्य प्रयोगाने नगरकरांचे मन जिंकले. नगर शहरात आणि महाराष्ट्रात प्रथमच सादर झालेल्या या प्रयोगाने शोभायात्रेचे मुख्य आकर्षण ठरवत मिरवणूक मार्गावर हजारोंची गर्दी ओढवली.

या शोभायात्रेची सुरुवात श्री मार्कंडेय मंदिर येथून झाली. त्यानंतर महामुनी चौक – चितळे रोड – दिल्ली गेट – नवरंग व्यायाम शाळा – बागडपट्टी – नेता सुभाष चौक मार्गे पुन्हा श्री मार्कंडेय मंदिर येथे येत, गांधी मैदान येथे मिरवणुकीचा समारोप झाला. संपूर्ण मार्गावर प्रेक्षकांच्या गर्दीने उत्साहाचे वातावरण रंगले होते.

श्री श्याम आर्ट, इंदोर तर्फे सादर झालेल्या या महाकाली ऍक्टमध्ये 'काली महाकाली', 'आदि अग्नी अनंत अग्नी', 'भोला नाचे मलंग' यांसारखी ऊर्जावान गाणी, देवी ऍक्ट, देवी पूजन, साडी–चोळी भरणं आणि थरारक अग्नी तांडव सादर करण्यात आले. या सादरीकरणातील रौद्र, तेजस्वी आणि मंत्रमुग्ध करणारे भावदर्शन पाहून प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

मिरवणूक मार्गाच्या प्रत्येक चौकात या महाकाली नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. विशेष म्हणजे, वेगवेगळ्या महाकाली देवीच्या वेशभूषेत कलाकारांनी वेगवेगळी नृत्य सादर करत प्रेक्षकांचे लक्ष वेधले. महाकालीच्या विविध रूपांचे दर्शन घडविण्यात आले. प्रत्येक ठिकाणी प्रेक्षकांच्या गर्दीने प्रांगणे फुलून गेले होते.

या महाकाली नृत्यात १५ कलाकारांनी महाकालीचा वेश धारण केला होता. महाकालीला जसे पारंपरिक पद्धतीने सजवले जाते, तसेच दागिने, वस्त्रे, शस्त्रे आणि अलंकारांसह या कलाकारांनी स्वतःला सजवून यात सहभाग घेतला. विशेष म्हणजे, या १५ कलाकारांपैकी एका कलाकाराने ३२ मुखी महाकाली अवतार साकारला होता, ज्यामुळे संपूर्ण सादरीकरणात तो अवतार मुख्य आकर्षण ठरला. भव्य दिव्य अशा या साजशृंगारातून महाकाली देवीची जिवंत प्रतिमा मिरवणुकीत अवतरल्यासारखी भासत होती. या देखण्या आणि दैवी रूपामुळे मार्गावरील प्रत्येक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाला.

श्री एकदंत गणेश मंडळ आणि शिवराज्यकर्ते प्रतिष्ठान दरवर्षी काहीतरी वेगळे, आगळेवेगळे सादरीकरण करतात. त्यामुळे या संस्थांच्या कार्यक्रमांची नगरकरांना विशेष प्रतीक्षा असते. यंदाच्या सादरीकरणाने तर पाहणार्यांची मने जिंकलीच, पण त्यांच्या कौतुकाची आणि अभिनंदनाची लाट संपूर्ण मार्गावर उसळली. अशा दर्जेदार आणि नाविन्यपूर्ण सादरीकरणाची उंची दरवर्षी वाढवणं हीच खरी कला! असे नागरिकांकडून मतप्रदर्शन करण्यात आले.

या सादरीकरणाचा कळस गाठत, अखेरीस महाकाली देवीला साडी–चोळी अर्पण करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. पण त्यापूर्वी संपूर्ण मिरवणुकीत ज्या महाकालीसाठी जे जे पारंपरिक, धार्मिक व सांस्कृतिक नृत्यप्रकार सादर होतात – त्या सर्व कलांचे दर्शन नगरकरांना या एकाच ठिकाणी झाले. वेगवेगळ्या वेशभूषेतून आणि रंगीबेरंगी साजशृंगारातून देवीचे विविध रूप उलगडले; कधी रौद्र, कधी करुणामय, तर कधी उत्साही रूप पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. अग्नी तांडवच्या वेळी तर कलाकारांनी अग्नीचे फवारे उडवून संपूर्ण वातावरणात थरार आणि रोमांच निर्माण केला. ढोल–ताशांच्या गजरात, जयघोषांच्या निनादात आणि टाळ्यांच्या कडकडाटात प्रत्येक नृत्याने वेगळीच ऊर्जा निर्माण केली.

मिरवणूक मार्गावर प्रत्येक ठिकाणी उत्सुकतेने थांबलेली गर्दी, ढोल–ताशांचा गजर, जयघोषांचा निनाद आणि महाकालीचे थरारक नृत्य – या सर्वांनी मिळून यंदाची नारळी पौर्णिमा नगरकरांसाठी आयुष्यभर लक्षात राहील अशी बनवली. कार्यक्रम संपता–संपता प्रत्येकाच्या मनात एकच विचार होता – हे दृश्य मी का चुकवलं? आणि ज्यांनी पाहिलं, त्यांनी अभिमानाने सांगितलं – अशी मिरवणूक पुन्हा कधी होणार?

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ओंकार बुरगुल, ऋषीकेश सामल, अमर सादुल, यश सामल, विनीत इराबत्तीन, माधव उडता, रोहन सामल, वरद अन्नलदास, ओंकार अन्नलदास, आकाश हरबा, शिवा कोंडा, दिनेश नागुल, गौरव कन्ना आदी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध कामामुळे हा प्रयोग नगरच्या सांस्कृतिक इतिहासातील अविस्मरणीय ठरला.

# अर्थजगत



## पावसाळा आणि कार इन्शुरन्स

पावसाळा आला की आपल्या शहरांमध्ये पूर, पाणी साचणे आणि रस्त्यांवरील अडथळे हे चित्र हमखास दिसून येते. या काळात फक्त प्रवासच कठीण होत नाही, तर गाड्यांच्या सुरक्षेलाही गंभीर धोका निर्माण होतो. पुरामुळे होणारे नुकसान, पाण्यामुळे इंजिनचे बिघाड, वायरिंग खराब होणे, गंज लागणे अशा अनेक समस्या वाढतात. त्यातच उंदरांचा त्रासही या हंगामात वाढतो आणि गाड्यांचे वायरिंग, सीटखालील भाग किंवा इंजिनमधील केबल्स त्यांचे सहज लक्ष्य बनतात.

अशा वेळी अनेक वाहनमालकांना प्रश्न पडतो की, त्यांच्या मोटर इन्शुरन्स पॉलिसीमधून या नुकसानीपासून कितपत संरक्षण मिळते?

**माहीत आहे?**

प्रत्यक्षात बहुतांश मोटर विमा पॉलिसीत ज्या जोखमींचा स्पष्ट उल्लेख आहे, फक्त त्यांच्याच नुकसानीचे भरपाई मिळते. साधारणत: पूर, वादळ, भूकंप, आग, चोरी किंवा तोडफोड यामुळे झालेले नुकसान कव्हर असते. मात्र, दीर्घकाळ उन्हामुळे रबर वितळणे किंवा नैसर्गिक झीज या गोष्टी आकस्मिक मानल्या जात नाहीत आणि त्यासाठी विमासुरक्षेचे कवच मिळत नाही.

पावसाळ्यातील सगळ्यात मोठा धोका म्हणजे पाणी गाडीत शिरल्यामुळे होणारे नुकसान. पॉलिसीमध्ये पूर किंवा वादळाची जोखीम नमूद असेल आणि गाडीत पाणी शिरल्याचे ठोस पुरावे असतील, तर क्लेम सहज मिळतो. पण पाणी शिरल्याचे पुरावे नसतील किंवा पॉलिसीत पुरापासूनचे कव्हर नमूदच नसेल, तर क्लेम फेटाळला जाऊ शकतो.

उंदरांमुळे होणारे नुकसानही या हंगामात वारंवार घडते. हे नुकसान साधारणत: आकस्मिक बाह्य कारणांत मोडते आणि त्याचा क्लेम करता येतो. परंतु, एकाच प्रकारचे नुकसान वारंवार झाले तर विमा कंपन्या ते निष्काळजीपणाचे लक्षण मानतात. त्यामुळे वाहनमालकांनी पूर्वतयारी केली पाहिजे.

या धोक्यांपासून अधिक संरक्षण हवे असल्यास विविध ॲड-ऑन कव्हर उपयुक्त ठरतात. इंजिन प्रोटेक्शन ॲड-ऑनच्या साहाय्याने पाण्यामुळे इंजिन बिघडल्यास लाखो रुपयांचा खर्च वाचवू शकतो. निल डेप्रिसिएशन, रोडसाईड असिस्टन्स यांसारखे कव्हर काहीशे रुपयांत मिळतात आणि मॉन्सूनसाठी अत्यंत फायदेशीर असतात. डीलरशिपकडून मिळणारी एक्स्टेन्डेड वॉरंटीही उंदरांमुळे किंवा हवामानामुळे होणाऱ्या बिगर-आकस्मिक नुकसानीसाठी मदत करू शकते.

क्लेम प्रक्रिया सुरळीत व्हावी यासाठी काही सोपे उपाय महत्त्वाचे ठरतात.

गाडीचे घटनेपूर्वीचे आणि नंतरचे फोटो काढणे हे पहिले पाऊल आहे.

पूरग्रस्त भागात गाडी शक्यतो उंच ठिकाणी पार्क करणे, हवामानाच्या इशाऱ्यांकडे लक्ष देणे, आणि सर्वेअर येण्यापूर्वी गाडी धुवू नये, हेही तितकेच गरजेचे आहे. हे सर्व उपाय वेळेत केल्यास नुकसान कमी होऊ शकते आणि क्लेम प्रक्रिया वेगवान होते.

थोडक्यात सांगायचे तर, गाडीचा विमा घेतला म्हणजे सर्व प्रकारच्या नुकसानीसाठी संरक्षण आपोआप मिळतेच, असे गृहीत धरू नका. आपल्या पॉलिसीची बारकाईने माहिती ठेवा, हंगामी जोखमींसाठी योग्य ॲड-ऑन निवडा आणि हवामानाचा अंदाज पाहून गाडीची पूर्वतयारी ठेवा. पावसाळा हा त्रासदायक ठरू नये, यासाठी सावधगिरीचा सर्वात मोठा मार्ग आहे.



*भारतामधील डिजिटल बँकिंग अधिक सोपी करण्याच्या दिशेने इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (आयपीपीबी) ने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आता ग्राहकांना पैसे पाठवण्यासाठी किंवा घेण्यासाठी ना तर वन टाइम पासवर्ड (ओटीपी) टाकावा लागेल, ना बोटांचे ठसे द्यावे लागतील. त्याऐवजी फक्त चेहरा स्कॅन करून व्यवहार करता येणार आहे. १ ऑगस्ट २०२५ पासून ही नवी सुविधा देशभर सुरू झाली असून, तिचा उद्देश सर्वांसाठी बँकिंग सुलभ आणि सोयीस्कर करणे हा आहे.*

## अवतरले फेस स्कॅन बँकिंग



फेस स्कॅन तंत्रज्ञानावर आधारित ही नवी पद्धत विशेषतः त्यांच्यासाठी फायदेशीर आहे, ज्यांना बोटांचे ठसे देताना किंवा ओटीपी मिळवताना अडचणी येतात. वृद्धांच्या बोटांचे ठसे अनेकदा फिके होतात, ज्यामुळे बायोमेट्रिक प्रणाली अयशस्वी ठरते. तसेच काही दिव्यांगांना ओटीपी मिळवून टाकणे हीसुद्धा जिकिरीची प्रक्रिया ठरते. या नव्या पद्धतीत ग्राहकाला फक्त आपल्या बँक खात्याशी संलग्न फोन किंवा डिव्हाइसवर चेहरा स्कॅन करायचा आहे. हे काम काही सेकंदांत पूर्ण होते, अगदी मोबाईलचा फेस लॉक उघडल्याप्रमाणे. ही पद्धत जलद असून स्पर्शाशिवाय कार्यरत असते, त्यामुळे संसर्गजन्य रोगांच्या परिस्थितीत संसर्गाचा धोका कमी होतो. याशिवाय, ही तंत्रज्ञान प्रणाली यूआयडीएआयच्या कठोर सुरक्षा नियमांवर आधारित असल्याने पूर्णपणे सुरक्षित मानली जाते. चेहरा स्कॅन करण्यात काही अडचण आली, तर ग्राहकांना जुनी पद्धत म्हणजे ओटीपी किंवा बोटांचे ठसे वापरण्याचाही पर्याय उपलब्ध राहतो.

ही सुविधा फक्त पैसे पाठवणे वा घेणे एवढ्यावर मर्यादित नाही. तिच्या माध्यमातून नवीन खाते उघडणे, खात्यातील शिल्लक तपासणे, इतर खात्यांमध्ये पैसे ट्रान्सफर करणे, तसेच वीज, पाणी, मोबाईल रिचार्ज यांसारख्या बिलांचे पेमेंट करणे या सर्व सेवा सहज शक्य होतील. अशा प्रकारे, ही तंत्रज्ञान बँकिंगमधील जवळजवळ सर्व व्यवहार सोपे आणि झटपट होणार आहेत.

इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकची स्थापना २०१८ मध्ये झाली असून, आज देशभरातील १.६ लाखांहून अधिक टपाल कार्यालयांच्या नेटवर्कसह ही बँक कार्यरत आहे. यातील जवळपास १.४ लाख टपाल कार्यालये ग्रामीण भागात आहेत, त्यामुळे ही सेवा दुर्गम भागांपर्यंत पोहोचते.

विशेष म्हणजे, ज्यांच्याकडे स्मार्टफोन किंवा इंटरनेट नाही, असे ग्रामीण ग्राहकही आपल्या जवळच्या टपाल कार्यालयात जाऊन ही सेवा वापरू शकतात. ही तंत्रज्ञान सेवा १३ भाषांमध्ये उपलब्ध आहे, ज्यात हिंदी, मराठी, बंगाली, तमिळ, तेलुगू, उर्दू, गुजराती, मल्याळम, कन्नड, उडिया, पंजाबी आणि आसामी अशा प्रमुख भाषा समाविष्ट आहेत.

**जाणून घ्या**

इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या या उपक्रमामुळे डिजिटल इंडिया आणि वित्तीय समावेशनाच्या मोहिमेला नवी गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विश्वेश्वरन यांनी सांगितले की, त्यांचा उद्देश बँकिंग सर्वांसाठी सुलभ आणि सन्मानजनक बनवणे हा आहे. जे लोक शारीरिक किंवा तांत्रिक अडचणींमुळे बँकिंगपासून दूर राहतात, त्यांना या तंत्रज्ञानाच्या मदतीने जोडणे हेच बँकेचे ध्येय आहे.

फेस स्कॅन बँकिंग ही प्रणाली केवळ सोपीच नाही तर सुरक्षितसुद्धा आहे. कारण ती आधारशी जोडलेली असल्यामुळे फसवणुकीची शक्यता अत्यल्प आहे. तसेच ही सेवा स्पर्शाशिवाय कार्यरत असल्यामुळे महामारीसारख्या परिस्थितीत आरोग्याच्या दृष्टीनेही धोका कमी होतो. कोविड-१९ च्या काळात, जेव्हा लोकांनी एकमेकांपासून अंतर राखणे आवश्यक होते, तेव्हा अशा प्रकारची तंत्रज्ञान व्यवस्था किती उपयुक्त ठरली असती याची आठवण सर्वांना होते. या सेवेमुळे ग्राहकांना वेगवान आणि सहज अनुभव मिळतो, त्यामुळे डिजिटल बँकिंग स्वीकारण्याचा वेगही वाढण्याची शक्यता आहे.

या नव्या उपक्रमामुळे बँकिंग क्षेत्रात केवळ तांत्रिक प्रगती होत नाही, तर ग्रामीण, वृद्ध आणि दिव्यांग नागरिकांपर्यंत बँकिंग पोहोचवण्याचा मार्ग अधिक सुलभ होतो. त्यामुळे डिजिटल भारताचे स्वप्न आणखी बळकट होणार आहे.

## शिल्लक राहिलेला नो क्लेम बोनस कसा वापरावा?

कार विम्यामध्ये नो क्लेम बोनस म्हणजेच 'एनसीबी' ही एक महत्त्वाची सवलत असते. ही सवलत विमाधारकाला तेव्हा मिळते जेव्हा त्याने मागील विमा कालावधीत कोणताही दावा केलेला नसतो. नो क्लेम बोनसमुळे पुढील वर्षीच्या विमा हप्त्यावर निश्चित टक्केवारीने सूट मिळते. परंतु बरेच वेळा असे घडते की एखाद्या व्यक्तीने आपली जुनी गाडी विकली असते, किंवा नवीन गाडी खरेदी केली असते, पण जुन्या पॉलिसीवरील नो क्लेम बोनस वापरलेला नसतो. अशा परिस्थितीत हा बोनस 'पेंडिंग' राहतो. योग्य प्रक्रिया वापरून तो नवा बोनस पुढील पॉलिसीमध्ये हस्तांतरित करता येतो.




सर्वप्रथम, एनसीबी पेंडिंग असल्यास त्यासाठी आधीची विमा कंपनी आपल्याला एक प्रमाणपत्र म्हणजेच 'एनसीबी ट्रान्सफर सर्टिफिकेट' देते. हे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी तुम्ही कंपनीला ईमेलद्वारे किंवा त्यांच्या वेबसाईटवरून विनंती करू शकता. हे सर्टिफिकेट मिळाल्यानंतर तुम्ही ते पुढील पॉलिसीमध्ये वापरू शकता. लक्षात ठेवा की हे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते दोन वर्षांच्या आतच वापरावे लागते, अन्यथा त्याची वैधता संपते.

नवीन विमा पॉलिसी घेताना त्या पॉलिसीमध्ये जुना एनसीबी समाविष्ट करून घ्यावा लागतो. यासाठी तुम्हाला जुन्या पॉलिसीची प्रत, गाडीचे नोंदणी प्रमाणपत्र (आरसी), आणि एनसीबी सर्टिफिकेट ही कागदपत्रे विमा कंपनीकडे सादर करावी लागतात. नंतर विमा कंपनी त्या माहितीची पडताळणी करून नवीन पॉलिसीवर तुम्हाला योग्य त्या टक्केवारीची सूट देते. या सूटमध्ये वर्षानुसार वाढ होत जाते. उदा. एक वर्ष दावा नसल्यास २० टक्के, दोन वर्ष सलग दावे नसल्यास २५ टक्के आणि पाच वर्ष सलग दावे नसल्यास पन्नास टक्क्यांपर्यंत सवलत मिळू शकते.

हे लक्षात घ्या की एनसीबी हा फक्त मूळ विमाधारकालाच लागू होतो. जर तुम्ही सेकंड हँड गाडी खरेदी केली असेल तर मागील मालकाचा एनसीबी तुम्हाला लागू होत नाही. त्यासाठी तुम्हाला तुमचा स्वतःचा एनसीबी वापरावा लागतो. शिवाय, चुकीची माहिती देऊन एनसीबी वापरण्याचा प्रयत्न केल्यास विमा कंपनी तुमचा दावा नाकारू शकते किंवा पॉलिसीच रद्द करू शकते. म्हणूनच खरी माहिती देणे आणि नियमांनुसार सवलत घेणे अत्यावश्यक आहे.

जर एखाद्या व्यक्तीने जुन्या गाडीचा विमा नवा घेतला नसेल किंवा जुनी गाडी विकल्यावर लगेच नवीन गाडी खरेदी केली नसेल, तरीही तो आपला एनसीबी वापरू शकतो, फक्त तो दोन वर्षांच्या आत वापरला गेला पाहिजे. काही वेळा अशा एनसीबी सवलती वापरणे विसरले जाते आणि विमाधारक अधिक हप्ता भरतो. म्हणूनच, कोणतीही नवीन पॉलिसी घेण्यापूर्वी आपल्याकडे पूर्वीचा नो क्लेम बोनस आहे का, हे तपासणे अत्यंत गरजेचे आहे. सरतेशेवटी, नो क्लेम बोनस ही विमाधारकासाठी मिळणारी एक फारच फायदेशीर सवलत आहे. योग्य वेळी त्याचा उपयोग करून, विमा हप्त्यात लक्षणीय बचत करता येते. त्यामुळे जुन्या पॉलिसीवरील पेंडिंग एनसीबी वापरण्याची प्रक्रिया लक्षपूर्वक आणि नियमांनुसार पूर्ण करावी, जेणेकरून तुम्हाला पुढील पॉलिसीमध्ये पूर्ण लाभ मिळू शकेल.

## 'रजिस्टर्ड पोस्ट'चा अलविदा

इंडिया पोस्टने आपल्या 'रजिस्टर्ड पोस्ट' या ऐतिहासिक सेवेला १ सप्टेंबर २०२५ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे पन्नास वर्षांहून जुनी ही डाक सेवा आता इतिहासजमा होणार आहे. डाक विभागाच्या आधुनिकीकरण योजनेअंतर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे. यानंतर सर्व ग्राहक आणि संस्थांना स्पीड पोस्टचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

रजिस्टर्ड पोस्टची सुरुवातीची किंमत २५.९६ रुपये होती आणि प्रत्येक अतिरिक्त २० ग्रॅम वजनासाठी ५ रुपये भरावे लागत होते. ही सेवा विशेषतः खेडी आणि लहान शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी स्वस्त व विश्वासार्ह पर्याय मानली जात होती. दुसरीकडे, स्पीड पोस्टची सुरुवातीची किंमत ५० ग्रॅमसाठी ४१ रुपये आहे, जी रजिस्टर्ड पोस्टपेक्षा साधारण २०-२५ टक्के महाग आहे. त्यामुळे या बदलामुळे लहान व्यापारी, शेतकरी आणि दुर्गम भागातील नागरिकांवर आर्थिक भार वाढण्याची शक्यता आहे.

पोस्टल विभागाचे सचिव व महासंचालक यांनी सर्व सरकारी कार्यालये, न्यायालये, शाळा-कॉलेजेस तसेच डाकसेवा मोठ्या प्रमाणावर वापरणाऱ्या ग्राहकांना १ सप्टेंबरपर्यंत पूर्णपणे स्पीड पोस्टकडे वळण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांच्या मते, स्पीड पोस्टमुळे पार्सल व पत्रव्यवहार जलद पोहोचतो, ट्रॅकिंग सोपे होते आणि कामकाजात पारदर्शकता वाढते. १९८६ मध्ये सुरू झालेली स्पीड पोस्ट सेवा आधीच लोकप्रिय आहे.



**रजिस्टर्ड पोस्टचा वापर घटला**

गेल्या काही वर्षांत रजिस्टर्ड पोस्टचा वापर सातत्याने घटत होता. सरकारी आकडेवारीनुसार, २०११-१२ मध्ये ज्या वेळी २४४.४ मिलियन रजिस्टर्ड डाक पाठवली जात होती, ती संख्या २०१९-२० मध्ये घटून १८४.६ मिलियनवर आली. डिजिटल कम्युनिकेशनच्या वाढीमुळे, तसेच खासगी कुरिअर आणि ई-कॉमर्स लॉजिस्टिक्सच्या झपाट्याने वाढलेल्या वापरामुळे रजिस्टर्ड पोस्टची मागणी कमी झाली आहे.

तथापि, या सेवेला बंद करण्याच्या निर्णयामुळे अनेकांना भावनिक धक्का बसला आहे. विशेषतः ग्रामीण भागातील आणि वयोवृद्ध नागरिकांमध्ये याबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे. ब्रिटिश काळापासून अस्तित्वात असलेली ही सेवा बँका, विद्यापीठे, न्यायालये आणि सरकारी कार्यालयांसाठी सर्वाधिक विश्वासार्ह मानली जात होती. तिची वैशिष्ट्ये म्हणजे डिलिव्हरीचा पुरावा कायदेशीर मान्य असणे आणि पत्रव्यवहार सुरक्षितपणे पोहोचणे ही होती. आता या सेवेला पूर्णविराम मिळाल्याने केवळ तांत्रिक बदल होणार नाही, तर भारतीय डाक इतिहासातील एक सुवर्णपानही बंद होणार आहे. रजिस्टर्ड पोस्टची आठवण जपणाऱ्या अनेकांना ती बंद झाल्याची खंत राहील, पण आधुनिक आणि जलद डाकसेवा स्वीकारणे हा काळाचा गरजेनुसार झालेला निर्णय असल्याचे मानले जात आहे.

## पर्याय लोन मोरेटोरियमचा

लोन मोरेटोरियम ही कर्जमुक्त होण्याची संधी नाही, तर काही काळासाठी पॉझ घेण्याच्या बटणाप्रमाणे आहे. बँका कर्जदारांना अनपेक्षित अडचणींमुळे एचख थांबवण्याची परवानगी देऊ शकतात. परंतु व्याज थांबत नाही. ते सुरूच राहतं आणि तुमच्या कर्जात वाढ करत जातं.




मोरेटोरियम म्हणजे तुमची थकबाकी माफ केली जात नाहीये, ती फक्त पुढे ढकलली जात आहेत. ही सवलत तुम्हाला काही काळासाठी सवलत देऊ शकते, परंतु कर्ज बंद करत नाही. कर्जाचा कालावधी जास्त असेल किंवा नंतर तुमच्या ईएमआयमध्ये वाढ होईल अशी अपेक्षा आहे. काहींसाठी, याचा अर्थ भविष्यात मोठा आर्थिक भार पडेल.

सर्वसाधारणपणे मोरेटोरियम आपोआप दिलं जात नाहीत. यासाठी तुम्हाला अर्ज करावा लागेल आणि आवश्यक ती दस्तऐवज, रुग्णालयाचं बिल, नोकरीचा संपवण्याचा पत्र, किंवा पगाराच्या पावत्या यांसारख्या कागदपत्रांसह त्याची कारणे स्पष्ट करावी लागतील. तुमचा खातं चांगल्या स्थितीत असावं (सामान्यतः ९० दिवसांपेक्षा जास्त उशीर न झालेला) आणि मंजुरीही प्रकरणानुसार दिली जाईल.

यासाठी तुमच्या कर्जदात्याशी बोला. तुमच्या आर्थिक स्थितीबद्दल प्रामाणिक राहा. संबंधित कागदपत्रे सादर करा. यामध्ये नोकरी गमावणं, आजारपण इत्यादींचा पुरावा द्या. अटी समजून घ्या. व्याज वाढेल का आणि ते तुमच्या मुदतीवर किंवा ईएमआयवर कसा परिणाम करते ते विचारा. हुशारीनं वाटाघाटी करा. तुम्ही कर्जाची मुदत वाढवू शकता किंवा ईएमआय कमी करू शकता. सर्व मोरेटोरियम क्रेडिट स्कोअरवर समान परिणाम करत नाहीत.

जर तुम्हाला खरोखर गरज असेल तरच या पर्यायाचा विचार का. जर तुम्ही ईएमआय भरणं सुरू ठेवू शकत असाल तर ते करा, ते तुम्हाच्या वाढत्या व्याजापासून बचाव करेल. गृहकर्ज भरणाऱ्यांसाठी हे लक्षात ठेवणं गरजेचं आहे की तुमचा बहुतेक ईएमआय व्याजातच जातो. हे मध्येच थांबवल्यानं नंतर खूप जास्त खर्च येऊ शकतो. मोरेटोरियम हे कर्ज थांबवण्याचा पर्याय बिलकूल नाही. तुमच्या बँकेशी बोला, आकडे तपासा आणि माहितीपूर्ण निर्णय घ्या.

**लोन मोरेटोरियमचे फायदे**

- कठीण काळात ईएमआयपासून दिलासा मिळतो
- लेट पेनल्टी किंवा डिफॉल्टर म्हणून नाव येत नाही.
- नोकरी गमावणे, आजारपण किंवा उत्पन्नात कपात यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत उपयुक्त
- लोन मोरेटोरियमचे तोटे
- व्याज वाढतच राहतं
- कर्जाची मुदत वाढणं किंवा वाढलेले ईएमआय
- मोठ्या कर्जांसाठी (उदा. गृहकर्ज), यासाठी कालावधी लांबू शकतो
- क्रेडिट कार्ड मर्यादा मर्यादित होऊ शकतात

## पतधोरणाचा अन्वयार्थ

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भाराताविरोधात २५ टक्के आयात शुल्काची घोषणा केली आहे. त्याचबरोबर भारताने रशियाकडून क्रूड खरेदी केल्यास दंड लावण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. अशा परिस्थितीत भारताला खनिज तेलाची आयात महागात पडू शकते. त्याचा परिणाम महागाई वाढण्यात होऊ शकतो. त्यामुळे परिस्थितीपूर्व खबरदारीची उपायोजना म्हणून रिझर्व बँकेच्या पत धोरण समितीने व्याजदर जैसे थे पातळीवर ठेवण्याचा निर्णय घेतला. मात्र भारताची स्थूल अर्थव्यवस्था कमालीची बळकट आहे. एवढेच नाही तर भारताचा विकासदर जगात सर्वात जास्त आहे. जागतिक विकास दरात भारताचे योगदानही सर्वात जास्त आहे. त्यामुळे यावर्षी भारताचा विकासदर ६.५% राहील या पूर्वीच्या अंदाजात रिझर्व बँकेने कसलाही बदल केलेला नाही. व्याजदर मात्र ५.५% या पातळीवर कायम ठेवले आहेत. रिझर्व बँकेने रोख - राखीव प्रमाण ठरविणारा दरही पूर्वीच्या पातळीवर कायम ठेवला आहे. या अगोदरच्या पत धोरणात हा दर एक टक्क्याने कमी केला होता. त्याची अंमलबजावणी डिसेंबरपर्यंत चालू राहणार आहे.




फेब्रुवारीपासून रिझर्व बँकेने व्याजदरात तीन टप्प्यात एक टक्का कपात केली आहे. याचा पूर्ण फायदा व्यावसायिक बँकांनी अजूनही ग्राहकांना दिलेला नाही. यासाठी आणखी बराच कालावधी लागू शकतो. अशा परिस्थितीत सध्या व्याजदर कपातची गरज पडणार नाही, असे पत धोरण समितीच्या सर्व सदस्यांना वाटले. पुढील पत धोरणात म्हणजे ऑक्टोबरच्या सुरुवातीला व्याजदरात कपात करण्याची शक्यता खुली आहे.

**उद्योग क्षेत्राकडून पतधोरणाचे स्वागत**

रिझर्व बँकेने अगोदरच पुरेशी व्याजदर कपात केली आहे. याचा सकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेवर होत आहे. देशातील आणि परदेशातील एकूण परिस्थिती पाहता यावेळी रिझर्व बँकेचा व्याजदरात बदल न करण्याचा निर्णय योग्य आहे असे उद्योग जगताने म्हटले आहे. शिवाय अगोदरच्या व्याजदर कपातीचा पूर्ण लाभ ग्राहकांना मिळालेला नाही. दरम्यानच्या काळात परिस्थिती सुधारल्यास व्याजदर कपातीची शक्यता खुली ठेवण्यात आल्याबद्दल उद्योजकांनी समाधान व्यक्त केले.

त्यामुळे भारतात दिवाळी- दसर्याच्या सुमारास नागरिकांना स्वस्त भांडवल उपलब्ध होऊन खरेदी वाढण्याची शक्यता खुली राहील. दरम्यानच्या काळात जागतिक परिस्थितीत काय बदल होतो, याकडे रिझर्व बँकेचे लक्ष राहणार आहे.

**दृष्टिक्षेपात पतधोरण**

- रेपो दर ५.५ टक्क्यावर कायम
- व्याजदरासंबंधातील निर्णय मतैक्याने
- विकासदर अंदाज ६.५ टक्क्यांवर कायम
- पहिल्या तिमाईचा विकासदर ६.५%
- दुसर्या तिमाईचा विकास दर ६.७%
- तिसर्या तिमाईचा विकासदर ६.६%
- चौथ्या तिमाहीचा विकासदर ६.३%
- वार्षिक पातळीवर महागाई ३.१ टक्के राहण्याचा अंदाज
- अगोदरच्या व्याजदर कपातीचा ग्राहकांना लाभ होण्याची गरज
- पुढील पतधोरण एक ऑक्टोबर रोजी
- देशांतर्गत स्थूल अर्थव्यवस्था बळकट
- कर्जरोख्यातील गुंतवणुकीसाठी एसआयपी
- चालू खात्यावरील तुट आवाक्यात
- व्यापार युद्धामुळे महागाई वाढणार नाही.



ग्रामदैवत श्री विशाल गणपती व महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, माळीवाडा परिसरात गेल्या काही दिवसांपासून खुलेआम वेश्या व्यवसाय सुरु असून, तो तातडीने बंद करण्यात यावा अशा मागणीचे निवेदन श्री विशाल गणेश मंदिर व श्री संत सावता महाराज उत्सव समिती यांच्या वतीने कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना दिले आहे. यावेळी परिसरातील नागरिक, महिला, युवक उपस्थित होते.

# माळीवाडा परिसरात खुलेआम वेश्या व्यवसाय सुरु

## अल्पवयीन मुले गांजा ओढत असतात, सर्व प्रकार तातडीने बंद करण्यासाठी नागरिकांचा 'कोतवाली'त मोर्चा

नगर - नगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती व महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, माळीवाडा परिसरात गेल्या काही दिवसांपासून खुलेआम वेश्या व्यवसाय सुरु असून, परिसरातील नागरिकांना त्यामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर निवासी घरे असून महिला व मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा मागणीचे निवेदन श्री विशाल गणेश मंदिर व श्री संत सावता महाराज उत्सव समिती यांच्या वतीने कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना दिले आहे. यावेळी परिसरातील नागरिक, महिला, युवक उपस्थित होते

या ठिकाणी रोज अनोळखी पुरुषांची वर्दळ होत असून, रात्री उशिरापर्यंत असामाजिक प्रकार घडतात. यामुळे आमच्या परिसरातील स्त्रिया, मुली आणि नागरिक असुरक्षिततेच्या वातावरणात राहतात. सार्वजनिक शांती भंग होत असून, हा प्रकार भारतीय दंड संहिता कलम ३७०, ३७१, तसेच अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अंतर्गत गंभीर गुन्हा आहे.

तसेच रात्री ११ नंतर अल्पवयीन मुले हे बाबर बिल्डिंग खाली गांजा ओढत असतात, त्यामुळे परिसरातील नागरीकाना त्या मुलांचा त्रास सोसावा लागतो. रात्री बे रात्री ते गांजा व दारु पिल्यानंतर त्यांचे वैयत्तिक भांडण व मोठ-मोठ्याने शिवीगाळ केल्याने जवळपासच्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तरी तात्काळ तपास करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, तसेच अशा प्रकारे कायमचा आळा घालावा.

# एमआयडीसी मधील उद्योजकाला मागितली खंडणी, स्वराज्य कामगार संघटनेच्या अध्यक्ष योगेश गलांडे, सचिव दत्तात्रेय तापकिरे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर - एमआयडीसी मधील एका नामांकित कंपनीचे काम सुरू ठेवण्यासाठी व वर्क ऑर्डर मिळत राहण्यासाठी वेळोवेळी धमक्या देत एकूण ६ लाख रुपये घेतल्याप्रकरणी स्वराज्य कामगार संघटनेचे अध्यक्ष योगेश गलांडे व सचिव दत्तात्रय तापकिरे (दोन्ही रा. बोल्हेगाव) यांच्यावर खंडणी व इतर कलमान्वये एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत उद्योजक चिरंजीव दत्तात्रेय गाढवे (रा. बोल्हेगाव) यांनी ९ ऑगस्ट रोजी तक्रार दिल्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला.

चिरंजीव गाढवे हे लघु उद्योजक असून, ते प्लॉट क्र. ६, एमआयडीसी येथे कंपनी चालवतात. २०१९ पासून एमआयडीसी मधील नामांकित कंपनीकडून वर्क ऑर्डरनुसार त्यांच्याकडे जॉबची मागणी होत आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये योगेश गलांडे यांनी गाढवे यांना कॉल करून, मी सदर कंपनीतील स्वराज्य कामगार संघटनेचा अध्यक्ष आहे व दत्तात्रय तापकिरे हे सचिव आहेत. तुम्हाला मिळालेल्या प्रत्येक वर्क ऑर्डरवर १० टक्के रक्कम द्यावी लागेल, अन्यथा एमआयडीसीतील कोणत्याही कंपनीकडून तुम्हाला ऑर्डर मिळणार नाही, अशी धमकी दिली.

काम बंद होण्याच्या भीतीने गाढवे यांनी सुरुवातीला तीन लाख रुपये रोख दिले. मात्र त्यानंतरही गलांडे यांनी वारंवार धमकी देत पैसे मागितले. ऑगस्ट २०२३ पासून आतापर्यंत पाच हप्त्यांत एकूण ६ लाख रुपये देण्यात आले. अनेक वेळा पैशाची मागणी वाढू लागल्याने गाढवे यांनी मागील काही महिन्यांपासून पैसे देणे थांबवले. गलांडे व तापकिरे यांनी वेळोवेळी त्यांच्या शितल इंडस्ट्रीज कंपनीच्या ऑफिसमध्ये बोलवून पैसे करिता धमकी दिली. वारंवार फोन करून व प्रत्यक्ष भेटून धमक्या देण्यात आल्या. ३ जून २०२४ रोजी गलांडे यांनी तापकिरे यांच्या मोबाईलवरून कॉल करून पुन्हा पैशाची मागणी केली. पैसे नाही दिले तर भविष्यात कोणत्याही कंपनीकडून काम मिळू देणार नाही, असे सांगून दबाव आणला.

जुलै २०२५ मध्ये बळगट कॅन्टीन येथे गलांडे यांनी प्रत्यक्ष भेटून पुन्हा धमकी दिली. त्यावेळी गाढवे यांनी भीतीपोटी तक्रार केली नाही. मात्र सतत सुरु असलेल्या धमक्या व पैशाच्या मागणीमुळे अखेर त्यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या प्रकरणी पोलिसांनी गलांडे व तापकिरे यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे.

# चुन्याची पुडी दिली नाही म्हणून चाकूने केला वार, गुन्हा दाखल

## आई वडिलांनाही लाकडी दांडक्याने मारहाण

नगर - चुन्याची पुडी दिली नाही याचा राग येवून तिघांनी तरुणावर चाकूने वार केले व त्याच्या पाठीवर कमरेवर लाकडी दांडक्याने मारहाण केली. यावेळी त्याला सोडवायला गेलेल्या त्याच्या आई-वडिलांनाही मारहाण करण्यात आल्याची घटना नगर तालुक्यातील जेऊरगावात १० ऑगस्ट रोजी रात्री ७.३० वाजता घडली.

या हल्ल्यात आदित्य बाळासाहेब पाटोळे हा जखमी झाला आहे, याबाबत त्याची आई अनिता बाळासाहेब पाटोळे (वय ३६ रा. जेऊर, ता. नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. जेऊर गावातील अंतोन रमा सोनवणे, पंढरी विजू सोनवणे आणि विजू सोनवणे (पूर्ण नाव माहित नाही) यांनी फिर्यादीचा मुलगा आदित्य पाटोळे हा घरासमोर असताना त्यास चुन्याची पुडी मागितली. त्यावेळी आदित्य याने चुन्याची पुडी दिली नाही याचा राग येवून अंतोन सोनवणे याने आदित्य याच्यात छातीत डाव्या बाजूला चाकूने मारले तसेच त्याच्या पाठीवर, कमरेवर, डोक्यात, लाकडी दाडक्याने मारहाण करुन त्यास जखमी केले. यावेळी पंढरी सोनवणे आणि विजू सोनवणे यांनी फिर्यादी व त्यांचे पती बाळासाहेब पाटोळे यांना शिवीगाळ करुन लाथा बुक्क्यांनी व दगडाने मारहाण केली या मारहाणीत आदित्य पाटोळे, अनिता पाटोळे व बाळासाहेब पाटोळे तिघे जखमी झाले.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अनिता पाटोळे यांनी दिलेले फिर्यादीवरुन तिघांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार अजिनाथ पालवे हे करीत आहेत.





रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल तर्फे रिमांड होम मध्ये रक्षाबंधन साजरे करण्यात आले.

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल तर्फे रिमांड होम मध्ये रक्षाबंधन

नगर - देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे या उक्तीप्रमाणे आणि रोटरीचे घोषवाक्य Service Above Self सर्व्हिस अबाऊ सेल्फ यानुसार रोटरी क्लबच्या सदस्यांनी दातृत्वाचे सुंदर उदाहरण घडवले. कार्यक्रमासाठी मनोज चंगेडिया गहू गोणी ५, तेल डबा १, मुलींसाठी कॉस्मेटिक्स, मेंहदी कोन व इतर साहित्य, निवृत्ती झिने खाऊ साहित्य, विनोद बोरा सफरचंद पेटी, राजेश परदेशी राख्या, हरीश पेमदाणी एक तेल डबयाचे योगदान दिले. सर्व सदस्यांनी उपस्थित राहून आपली सेवा दिली.

यावेळी पीडीजी शिरीष रायते, ईश्वर बोरा, विनोद बोरा, निवृत्ती झिने, मनोज चंगेडिया, राजेश परदेशी, संजय मुनोत, अजय गांधी, विजय जुंदरे, अमृत कटारिया, नरेंद्र चोरडिया, सुजाता कटारिया, मनीष बोरा, ॲन्स नीलम परदेशी, साजरी परदेशी, रिमांड होम संस्थेचे सचिव फातिमा मॅडम सर्व शिक्षक व मदतनीस विद्यार्थी व विद्यार्थिनी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाना वरुन बोलताना सुनील कटारिया यांनी सर्वांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. व म्हणाले की, हा सण फक्त भाऊ बहिणीच्या नात्याचा नाही, तर प्रेम, विश्वास आणि संरक्षणाच्या वचनाचा उत्सव आहे. राखी ही फक्त दोऱ्याची गाठ नसून, मनांना जोडणारी भावनिक नाळ आहे. स्वतःवर विश्वास ठेवा, शिक्षणाला प्राधान्य द्या, आपल्या स्वप्नांचा पाठलाग करा. जशी राखी जबाबदारीची जाणीव करून देते, तशीच तुम्हीही समाजात आपले स्थान निर्माण करा. रोटरी क्लब नेहमीच तुमच्या पाठीशी आहे, असे सांगितले.

मनोगत व्यक्त करतांना पीडीजी शिरीष रायते म्हणाले की हा उपक्रम गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ रोटरी सेंट्रल सातत्याने राबवत आहे.

फातिमा मॅडम यांनी रिमांड होम संस्थेच्या वतीने रोटरी क्लबच्या सातत्यपूर्ण मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ईश्वर बोरा यांनी आभार मानले.

# सावेडीत जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

## आदिम संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या रॅलीने वेधले लक्ष, रॅली, नृत्य, वेशभूषा स्पर्धेतून आदिवासी अस्मितेचा जागर

नगर - आदिवासी सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने जागतिक आदिवासी दिन सावेडी उपनगरात उत्साहात साजरा करण्यात आला. आदिम संस्कृतीचा ठसा उमटवणारी रॅली, पारंपरिक नृत्य, आदिवासी वेशभूषा व विचार-संस्कृतीवरील स्पर्धा या माध्यमातून आदिवासी बांधवांनी आपली समृद्ध परंपरा, अस्मिता आणि सांस्कृतिक वैभव नगरकरांसमोर सादर केले.

थोर आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांना अभिवादन करून प्रोफेसर चौक येथून रॅलीला सुरुवात झाली. वाद्यांच्या गजरात, पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिला-पुरुषांच्या सहभागामुळे रॅलीत रंगत आली. जल, जंगल, जमीन आमचा हक्क, आमचा जीव या घोषणांनी परिसर दुमदुमला. रॅली मार्गावर उभे असलेल्या नागरिकांनीही उत्साहाने प्रतिसाद दिला.




आदिवासी सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने जागतिक आदिवासी दिन सावेडी उपनगरात उत्साहात साजरा करण्यात आला.

रॅलीचा समारोप भस्तबाग महालाजवळील श्रेयस लॉन येथे झाला. येथेच मुख्य कार्यक्रम पार पडला. या वेळी रंगतदार आदिवासी नृत्यप्रस्तुतींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या नृत्यातून निसर्गाशी एकरूप जीवनपद्धती, परंपरा व लोककला यांची झलक पहायला मिळाली. कार्यक्रमात आदिवासी वसतिगृहातील गुणवंत विद्यार्थी तसेच आदिवासी बालकलाकारांचा सन्मान करण्यात आला. वेशभूषा, नृत्य व विचार-संस्कृती या विषयांवरील वक्तृत्व स्पर्धांमध्ये विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देण्यात आले.

प्रमुख पाहुणे प्रभाग अधिकारी एस.बी. तडवी यांनी आदिवासी हा निसर्ग पूजक, प्रकृती रक्षक व पर्यावरण संरक्षक आहे. जल-जंगल-जमीन यांचे जतन हीच खरी आदिवासींची जीवनशैली असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष काशिनाथ गवांदे यांनी आदिवासींच्या संघर्षमय इतिहासाची माहिती दिली. या कार्यक्रमात राहता, शिर्डी, अकोले, पारनेर, राहुरी, पाथर्डी या तालुक्यांतील आदिवासी बांधवांनी सहभाग नोंदवला. महिलांचा सहभागही लक्षणीय होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद कोरडे यांनी केले. संतोष नवले यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आदिवासी सेवा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.




महायुती सरकारमधील भ्रष्ट आणि कलंकित मंत्र्यांची तातडीने हकालपट्टी करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली.

# शिवसेनेची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

## भ्रष्ट आणि कलंकित मंत्र्यांच्या हकालपट्टी करा

नगर - महाराष्ट्रातील महायुती सरकारमधील भ्रष्टाचारामुळे राज्याची बदनामी होत असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. भ्रष्ट आणि कलंकित मंत्र्यांची तातडीने हकालपट्टी करण्याची मागणी करण्यात आली.

या निदर्शनात नगर दक्षिण जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, नगर दक्षिण विधानसभा संपर्कप्रमुख जगदीश चौधरी, तालुकाप्रमुख बबनराव शेळके, योगीराज गाडे, युवासेना जिल्हाप्रमुख पप्पू भाले, मनोज गुंदेचा, रावजी नांगरे, जेम्स अल्हाट, महेश कुलकर्णी, चंद्रकांत शेळके, मारुती राठोड, रामकिसन भिसे, आदम पठाण, सुभाष बोरसे, गौरव ढोणे, आनंद राठोड, विलास उबाळे, महावीर मुथा, विकास भिंगारदिवे, आकाश आल्हाट, सुनील भोसले, अनिस चुडीवाला, शैलजा लांडे, उषा भगत, सुनील भोसले, राजेश गारगुड, अजित हासे, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील काही मंत्री जुगार, जादूटोणा, भ्रष्टाचार व गैरव्यवहारात अडकले असून, त्यांच्यावर कारवाई होत नाही. कृषी मंत्र्यांना क्रीडा मंत्रिपद देणे, समाजकल्याण मंत्र्यांवर ६० कोटींचा घोटाळा व १५०० कोटींचा गैरव्यवहार उघड झाल्यानंतरही सरकार मौन बाळगत असल्याचा आरोप करण्यात आला. राज्यातील गृह राज्यमंत्र्यांच्या आईच्या नावे डान्सबार सुरु असून त्यावरही कारवाई न झाल्याचे निवेदनात नमूद आहे. भ्रष्टाचारातून लाभ घेणाऱ्या मंत्र्यांचे त्वरित राजीनामे घेऊन त्यांची हकालपट्टी करावी, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा शिवसेनेने दिला आहे.

# डीजे वाजवल्याप्रकरणी तीन मंडळावर गुन्हे दाखल

नगर - रक्षाबंधन व नारळी पौर्णिमा निमित्त शहरात मिरवणुका काढण्यात आल्या. यावेळी मिरवणुकीदरम्यान परवानगीपेक्षा जास्त आवाजात डी.जे. सिस्टीम वापरून ध्वनीप्रदूषण केल्याप्रकरणी तीन मंडळांच्या अध्यक्षासह डीजे चालक मालकांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन निमित्त शहरातून निघालेल्या मिरवणुकीमध्ये मोठ्या आवाजात डीजे लावल्याचे निदर्शनास आल्याने पोलिस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या आदेशावरुन तोफखाना पोलिसांनी डेसिबल मीटरच्या सहाय्याने तीनही मंडळांनी लावलेल्या आवाजाचे मोजमाप केले असता तीनही मंडळाने शासनाच्या नियमावलीचे उल्लंघन करुन कर्णकर्कश आवाजात गाणी लावण्यात आल्याचे तसेच त्यांना याबाबत सूचना देऊनही मंडळ पदाधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे समोर आले.

याप्रकरणी शिवराज्यकर्ते मित्र मंडळचे अध्यक्ष ऋषिकेश यल्लान्ना सामल, डी.जे. चालक रोहित जावळे, जय हनुमान मित्र मंडळचे अध्यक्ष रंगा आशीष अरविंद, डीजे चालक वसंत बबन लोखंडे, श्री मार्कंडेय महामुनी पालखी उत्सव समितीचे अध्यक्ष ओमकार कैलास श्रीपत, डीजे चालक अक्षय विठ्ठलराव शिंगणे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम ३, १५ आणि ध्वनी प्रदूषण अधिनियम २००० कलम ३, ४, ५, ६ नुसार तीन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

# पालेभाज्या व फळभाज्यांच्या बियांपासून बनवलेल्या राख्या झाडाला बांधून भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी घेतली वृक्ष संवर्धनाची शपथ

## वृक्ष संवर्धन चळवळीची शहरात चांगली सुरुवात : मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर - स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियानांतर्गत शहरातील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल मध्ये सहावी 'ई' च्या विद्यार्थीनींनी पर्यावरणपूरक उपक्रम साजरा करत झाडाला राखी बांधून आगळे वेगळे वृक्षाबंधन साजरे केले. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून अहिल्यानगर महानगरपालिका, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व इको क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी पालेभाज्या व फळभाज्यांच्या बियांपासून विद्यार्थिनींनी झाडांचे संरक्षण करणे ही काळाची असलेली गरज या उपक्रमामधून दाखवून दिली आहे, असे मत यशवंत डांगे यांनी व्यक्त केले.





पालेभाज्या व फळभाज्यांच्या बियांपासून बनवलेल्या राख्या झाडाला बांधून भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी घेतली वृक्ष संवर्धनाची शपथ घेतली.

बहिणीने भावाला राखी बांधल्याने तो तिचे संरक्षण करतो ही परंपरा आहे. परंतु या विद्यर्थीनीनी झाडालाच आपला भाऊ मानला आहे. त्याला राखी बांधून त्याचेच संरक्षण करण्याची जबाबदारी घेऊन एक नवीन परंपरा सुरू केली आहे. राखीच्या नात्याला हरित स्पर्श उपक्रमात आम्ही तुझे रक्षण करतो, तू आमचे रक्षण कर... या ब्रीदवाक्याने झाडांशी बंध जुळवत, विद्यार्थ्यांनी स्वतः लावलेल्या निलमोहोर, बहावा, कडुनिंब आदी झाडांना राख्या बांधून त्यांचा पहिला वाढदिवस साजरा केला. स्काऊट गाईड अंतर्गत बनवलेल्या पर्यावरण पूरक राख्यांना चांगला प्रतिसाद मिळाला आहे. सहावी 'ई' च्या विद्यार्थ्यांनी पालेभाज्या व फळभाज्यांच्या बियांपासून राख्या बनवून राखी स्टॉल उभारला. विद्यार्थ्यांनी झाडांच्या संरक्षणाची प्रतिज्ञा घेत वर्षभर झाडांना पाणी देत राखलेले प्रेमाचे नाते व पर्यावरण संवर्धनाबाबत सामाजिक जबाबदारीची जाणीव सर्वांना करून दिली. या माध्यमातून वृक्ष संवर्धन चळवळीची चांगली सुरुवात शहरात झाली असल्याचेही यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

मुख्याध्यापक उल्हास दुगड म्हणाले की, या मुलींनी भविष्यात कोणतेच झाड तोडणार नाही, अशी शपथ देखील घेतली. झाडांच्या संगोपानाबरोबर नवीन झाडे लावण्याचा संकल्पही या मुलींनी केला आहे. मुलींनी हा पर्यावरणपूरक उपक्रम साजरा करून एक आदर्श सर्वांसमोर ठेवला आहे. मोठ्या माणसांनी याचा आदर्श घेऊन हा उपक्रम राबवण्याची गरज आहे. तरच झाडे वाचवली जातील आणि दरवर्षी ढळणारा पर्यावरणाचा समतोल राखण्यास काही का होईना हातभार लागेल, असे ते म्हणाले.

